सीताराम कृ. कुडव

# विचारशलाका

भाग २ रा

विचारशलाका

विचारशलाका

विचारशलाका

विचारशलाका

# सर्वज्ञ समाज प्रबोधन संस्था, मुंबई


**श्री. सीताराम कृष्णा कुडव**

संस्थापक - अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| श्री. वासुदेव माधव ढाके | - | सचिव |
| श्री. प्रभाकर गोरवे | - | खजिनदार |
| श्री. दौलत प्रभुलकर | - | विश्वस्त |
| श्री. आत्माराम सखाराम डिगे | - | विश्वस्त |
| श्री. मनोज पागदरे | - | विश्वस्त |
| प्रज्ञा कुडव | - | विश्वस्त |
| सागर कुडव | - | को-ऑर्डिनेटर |


**प.से.अच्युत गोत्रिय सहकाऱ्यास कृ. साष्टांग दंडवत प्रणाम**

विचाराशलाका चा दुसरा भाग तुमच्या सेवेत अर्पण करताना हृदय समाधानाने भरून आलं. कारण पहिला भाग जेव्हा समाजात प्रसारित केली तेव्हा काही मोठ्या अधिकरणानी मी लिहीलेल्या काही तत्वसिध्दांतिक विचारांना आक्षेप घेऊन पुस्तक वितरणास मज्जाव केला. तसेच बऱ्याच आधिकरण ज्ञानीयानी, असंख्यात अच्युत गोत्रियानी पत्र पाठवून, फोन करुन अभिनंदन करुन धन्यवाद दिले.

बंधुनो हें संशोधनपर विचार फक्त थोडक्यात आहेत. वाचा मंथन करा आणि जागे व्हा!

धन्यवाद!

**आ.प.से.सी.कृ.कुडव**

रेखा संजय कुडे

# विचारशलाका

## भाग २ रा

संशोधक : लेखक : संपादक

सीताराम कृष्णा कुडव

# विचारशलाका : भाग २

प्रथमावृत्ती — जानेवारी २०१७

संशोधक : लेखक : संपादक — सीताराम कृष्णा कुडव

© सी. कृ. कुडव

प्रकाशक — सर्वज्ञ समाज प्रबोधन संस्था, मुंबई

११५/९१८ मोतीलाल नगर नं. १, रूपवते मार्ग,

त्रिकोणी मैदानासमोर, गोरेगाव (प), मुंबई — ४००१०४

अक्षर जुळवणी — स्नेहा खरे

मुद्रक — शिवम ग्राफिक्स

गोरेगाव (प) मुंबई — ४००१०४

किंमत — २५ रूपये

# विचार शलाका भाग २

माझ्या अच्युत गोत्रियाना दंडवत प्रणाम.

बंधुनो; विचार शलाका या पुस्तिकेचा पहिला भाग २००६ ला घेउन आपणा समोर आलो. त्या पुस्तिकेच्या २ आवृत्या संपून तिसरी आवृत्ति अर्धि संपलेली आहे.

आतां विचारशलाका भाग दुसरा हा द्रकश्राव्य माध्यमाधारे काही शंका तर काही प्रश्न घेउन मी तुमच्या समोर येत आहे.

बंधुनो; पुर्वीसारखा आजचा बहुतांश समाज अक्षर आंधळा राहिलेला नाही किंवा गबाळा राहिलेला नाही. शिक्षणाने तसेच जागतिक जवळिकेमुळे आजच्या समाजाला खरं काय? खोटं काय? याची बऱ्यापैकी जाण आलेली आहे. आजच्या पिढीला एकादा संशोधनात्मक मार्ग दाखवला तर तो मुळापर्यंत जावून यथार्थ योग्य ते प्राप्त करणारा आहे.

बंधुनो; भारतभर बऱ्याच ठिकाणी मी गेल्या पाच सहा वर्षापासून प्रबोधनात्मक हेतुने फिरतो आहे. पण नवसमाजाच्या विषयींचा अनुभव फार भयानक वाटला, त्यानी सांगितलेले आपले अनुभव भयानक आणि मेंदु बधिर करणारे वाटले. याची कारणे आपल्या पंथीय आचार विचारांतच दडलेली आहेत. असो!!

अच्युतगोत्रियाना मी नम्रविनंती करतो की, या विचारशलाकातील विचार ज्याना समजतील, पटतील त्यानीच विचार करून स्विकारावे. ज्याना समजत नसतील, पटत नसतील त्यांनी दुर्लक्ष करावे!

परमार्गात आल्यापासून माझ्या सहज स्वभावाचा सर्वांनीच दुरूपयोग करून घेतला, पदोपदी माझा विश्वासघात केला. संपूर्ण समाज ज्ञानप्रधान न होता भावनाप्रधान, अंधश्रध्दायुक्त कर्मकांडांच्या अथांग सागरात गटांगळ्या खात आहे. ऐहिक सुखोपभोगा मागे धावतो आहे. श्रीकृष्णांनी जीवन मुक्तीचा जो आचारधर्म सांगितला तोच आमच्या स्वामींनी सांगितला. आठशे वर्षापुर्वीच्या उच्च्यभ्रु धर्ममार्तडांच्या तो पचनी पडला नाही. म्हणून त्यांनी स्वामींवर दोन वेळा विषप्रयोग केला. स्वामींनी ते विष निर्वीष केलं. नंतर देवता आव्हानीत यंत्रासनावर स्वामींना बसायला लावलं. परंतु सर्व देवताचे मालक स्वामी! अशा उपायानी स्वामी नष्ट

होत नाहीत मग राज्याधिकार गाजवून स्वामींवर स्त्री अभियोगाचा खोटा आरोप ठेवून मुखकमलावरील नाक व कान अवयव छेदले. ह्या प्रकाराने स्वामींचा सर्व भक्तपरिवार भयकंपीत झाला. भटोबास, नाथोबा, आउसा सोडले तर स्वामींपाशी कुणीच नव्हता. बाइसांनी प्राण त्याग केला होता. नाथोबाना बळेग्रामच्या भक्ताना स्वामींनी बोलवायला पाठवलं तर त्यांनी आम्हाला फुरसत नाही, आम्ही येउं शकत नाही. असा निरोप नाथोबांकडे पाठवाला. ऐवढे ते हेमाद्रीपंडित, ब्रम्हसानु, महादाश्रमच्या दहशतीला घाबरले होते. त्यांच्या दहशतीपुढे स्वामींच्या आगाधत्वालाही त्यानी दुय्यमस्थान दीले.

नाथोबानी नकाराचा निरोप आणलेला ऐकून स्वामी उदास होउन म्हणाले **"खचले प्राणी! गेलीया बुध्दी! जाली धर्महानी!"** (हे स्वामींचे उद्गार काय दर्शवितात याचा सुज्ञानी विचार केलेला बरा).

तर स्वामी ईश्वर! स्वामींनी मुखकमलावरील अवयव लिलया पुन:स्थापित केले आणि पुन्हा समाज उध्दाराच्या, समाज प्रबोधनाच्या कार्याला सुरूवात केली.

स्वामी पुन्हा उजळ माथ्याने समाजात वावरताना पाहून हेमाद्रीपंडित, ब्रम्हसानु, महदाश्रम यांच्या तळपायाची आग मस्तकांत चढते. मग निश्चयाला पेटतात, स्वामींना नष्ट करण्याचा निग्रहच करतात आणि एक दिवस धडावरील भाग वेगळा करतात. अशीही त्यांची ईश्वराच्या हननापर्यंत नित्यनरकाची चाल पूर्ण झाली.

मग स्वामींनी तोही भाग लीलया पुन्हा धारण करून उतरापंथी गमन केलं आणि तेव्हापासून ईश्वरधर्माला अवकळा आली.

तरीही ईश्वरधर्म टीकावा हा ईश्वराचा मनोधर्म होता. म्हणून नागदेवाचार्यासारख्या शुरवीर, धिरवीर पुरूषांना ईश्वरधर्माची तालीम देउन स्वामींनी परीपुर्ण केलं होतं. त्यातच म्हाइंभटासारख्या षडशास्त्रसंपन्न पंडिताना आपल्या भजनी लावलं होतं. पुढे या द्वयीनी आपली सर्वशक्ति पणाला लावून, फार कष्ट घेउन स्वामींच्या लीळा ग्रथित केल्या. हेमाद्रीपंडित, ब्रम्हसानु, महदाश्रमाचा काळ मागे पडल्यावर भटोबास, म्हाइंभट, जानो उपाद्येनी पुन्हा धर्मप्रचाराला सुरूवात केली. ते गावोगांव फीरू लागले. हे पाहून धर्ममार्तंडाच्या कुळांतील काही मुत्सध्दीनी तोतया बनून धर्मात प्रवेश केला. भटोबासांकडून शास्त्र जाणून घेतलं. हे शास्त्र जर समाजात पसरलं तर समाज जागृत होइल. आमच्या पुर्वजानी आमच्या

समाजासाठी विनासायांस, विनाकष्ट आर्थिक फायद्याच्या ज्या कर्मकांडी रूढी समाजात पसरवून ठेवल्या आहेत. त्या समाज बंद करील. मग आमचं, आमच्या समाजाचं कसं होइल? ह्या विवंचनेपोटी ते तोतये म्हाइंभटां नंतर भटोबास इहलोक सोडून केव्हां जातात याची वाट पहात राहीले. भटोबास गेल्यानंतर त्यानी डाव साधला केशराजबासांची हत्या केली आणि ईश्वरशास्त्राचा जो गाभा स्वामींचं लीळाचरित्र तेच नष्ट केलं. दोनदा नष्ट केलं. त्याला मोगलांच्या धाडीचं नीमित्त सांगून वैदिक, दशावतारी, नाथपंथीय, जैनधर्मीय आचारसंहितेची सरमीसळ करून दुप्लीकेट लीळाचरित्र निर्माण केलं.

आतां मध्येच एक शंका उपस्थित करतो पहा. मोगल धन आणि जवान स्त्रीयांची लूट करीत होते. ती त्यांच्या फायद्याची होती. तर कागदांच्या पोथ्यांशी त्याना काही देणंघेणं लागेल काय? तर लीळाचरित्र मोगलांच्या धाडीत गेलं. असा हा युक्तिवाद मुर्खपणाचा वाटत नाही? याचा प्रत्येक स्वामी भक्ताने विचार करावा. असो! तर कै. केशराजबासाना ही कल्पना पूर्वीच आली होती. म्हणून त्यानी स्वामींची वचने ग्रथित करून वेगळा सुत्रपाठ लीहून ठेवला होता. मग त्याच सुत्रपाठांतील वचनाच्या आधारावर बरीचशी दुप्लिकेट सूत्र सर्वज्ञांनी निरूपिलेल्या समाजव्यवस्थेच्या विपरीत अन्य धर्म पंथाचे विचार लीहून त्या तोतयानी पोथ्या निर्माण केल्या.

**“इदं ते ना तपस्काय नाभक्ताय कदाचनं**

**न चाशुश्रूषवे वाच्यं नच मां योऽभ्यसूयचि”**

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात हे शास्त्र जो तप करीत नाही, जो ईश्वराला मानीत नाही. स्वत:लाच ईश्वरी अंश समजतो, ज्याला ईश्वराचे ब्रम्हविद्याशास्त्र ऐकण्याची इच्छा नाही अशाना हे शास्त्र सांगू नका.

आमच्या स्वामींच्याही मुखी अशाच अर्थाचे शब्द घातलेले आहेत. तो प्रसंग असा आहे. एक दिवस साधाइसाना स्वामींचं निरूपण काही कारणास्तव चुकते. मग साधाइसा स्वामींना विचारते, “जी जी : काल आपण नागदेवाला जे शास्त्र निरूपण केलेत ते आज मला निरूपण करावे जी.” मग स्वामी निरूपण करतात. साधे हो; ज्यांना ईश्वर जोडायची तळमळ असेल त्यानी **“विकर विकल्प शुन्य! स्वभावो मात्रे! नीरालंबी! ईश्वर (देवता) स्मरणे जो जन्म क्षेपी! तेयासि परमेश्वर पुनरूपी आपुला संबंध देती!”**

**विकार** म्हणजे राग, द्वेष, काम, क्रोध, मद, मत्सर हे षड् विकार. **विकल्प** म्हणजे माणसामाणसांतील जन्मकर्मानुसार जातिवाचक भेदभाव मानणे, शी, थू, घाण वगैरेची शून्यता करणे अशा मानसिक क्रीयाना पायबंध घालणे. **स्वभाव मात्रे** म्हणजे भुक, तहान, मळ, मूत्र, शीत, उष्ण, भय, नीद्रा ह्या देहाच्या अष्टस्वभावांवर नियंत्रण करणे. **'नीरालंबी'** म्हणजे एका ईश्वरावाचून कुणावरही अवलंबून न राहणे. उदा. आपण कष्ट न करतां अमका मला देइल. तमका माझी काळजी वाहील. जीवनात संकटांचे भोग आले तर ते निवारण्यासाठी कर्मकांडावर अवलंबून राहणे वगैरे वगैरे अशा अनेक उपायांवर अवलंबून न राहाणे. **ईश्वर स्मरणे** म्हणजे ईश्वराने नीरूपिलेल्या आचार वचनाची अखंड आठवण करणे. म्हणजे समाजात वावरताना समोर येणारी प्रलोभने, चौर्यकर्माची भावना, तसेच संकटकाळी हताष, निर्बळ होण्याचा प्रसंग येणे. अशा जीवनातल्या अनेक अडी अडचणी तसेच सुखं भोगते समयी प्रत्येक प्रसंगागणिक– ईश्वराने विहिलेल्या आचारधर्माच्या वचनाचे स्मरण करून प्रलोभनाला, संकटाना शरण न जाणे. अशाप्रकारे देह पडेपर्यंत जो आचरण करील. अशाच साधकाला परमेश्वर आपली पुन: भेट देतात.

हे निरूपण करून झाल्यावर स्वामी साधाइसाना सांगतात **"साधे हो; हे शास्त्र कव्हणाप्रति न बोलावे!"**

तात्पर्य:– स्वामी सांगतात **अर्थ तो प्रकरण वषे! अर्थि दृष्टांत दीजे!** असं असताना लीळेतील प्रसंग म्हणजे प्रकरण कोणतं? आणि स्वामी निरूपण काय करतात? आणि शेवटी हे आचार शास्त्र कव्हणाप्रति न बोलावे! असं कसं काय सांगतील? लीळेतील प्रसंगाचा आणि शेवटील आज्ञेचा कुठे मेळ तरी बसतो कां? याचं मंथन कुणी करावं?

ज्या ईश्वराने जीवाना ज्ञान देवून मुक्ति देण्यासाठी सृष्टीची निर्मिती केली. तेच ज्ञान, तेच शास्त्र कुणाला सांगू नको असं कसं सांगतील? हा जीव प्रत्येक मनुष्य सृष्टीत ईश्वराचं ज्ञान गमावून बसलेला आहे. म्हणून ईश्वर पुन्हा पुन्हा जीवाना ज्ञान देण्यासाठी पुन्हा पुन्हा अवतार धारण करतात. मग **'हे शास्त्र कव्हणाप्रति न बोलावे'** अशी आज्ञा कशी काय करतील? याचा आपण साधक बाधक, आक्षेप, परिहाराने नको कां विचार करायला? तर अशी शंका आपण आपल्या गुरूना, अधिकरणाना, महात्म्याना विचारली तर ते सांगतात. अधिकारावाचून हें शास्त्र कुणाला सांगू नये! म्हणजे कोण अधिकारी आणि कोण

अनाधिकारी हे जाणण्याची फुटपट्टी यांच्यापाशी आहे काय? यांच्या पीढिपरंपरेने चालत आलेल्या रूढी समाजावर लादल्याजात आहेत आणि समाज डोळ्यांवर झापडं ओढून विन्‌बोभाट ते आचरण करीत आहे. कुणी जिज्ञासु काही शास्त्रचर्चा करूं पहात असेल तर "तुम्ही पहिले अनुसरा" मग तुम्हाला ज्ञान सांगतां येइल! किंवा ज्ञानाचा अधिकार उदयास यावा लागतो. अधिकारी जीवासच ज्ञान सांगतां येतं. वगैरे वगैरे सांगून गप्प करतात.

"मायबापहो; अधिकार! अधिकाराशिवाय ज्ञान सांगतां येत नाही! अधिकाराशिवाय ज्ञान सांगता येत नाही! हे शब्द ऐकून ऐकून माझ्या कानठळ्या बसल्या! कारण स्वामी सांगतात **"प्रपंच जमूड आहे! देवतांचे अधिकारेवीण घेते द्वार नुघडेचि!"** म्हणजे देवताना ईश्वरज्ञान प्राप्त करण्याचा अधिकारच नाही आणि जीव मात्र सर्वाधिकार्या! याचाच अर्थ जीवाकडे जसा पापपुण्य करण्याचा अधिकार आहे. तसाच ईश्वराचे ब्रम्हविद्याशास्त्र आत्मसात करण्याचा जन्मसिध्द अधिकार जीवाचा मुळचाच तमामध्ये असताना पासूनचा आहे. असं असताना हे ज्ञानी "अधिकाराची" पुंगी वाजवून आर्तवंताला कां बरं गप्प बसवतात? याचा विचार नको कां करायला?

बंधुनो; अधिकार हा जीवाकडे मुळचाच आहे. त्यांत वाढ किंवा घट कधीच होत नाही. तर अनेक मनुष्य जन्माच्या सुसंस्काराची किंवा हीन संस्काराची वाढ होत असते. श्रीकृष्णचक्रवर्ति म्हणतात **"ज्ञानाग्नी दुग्धकर्माणी"** म्हणजेच ईश्वराच्या ब्रम्हविद्या शास्त्राचा अभ्यास करून त्या ज्ञानाप्रमाणे आचरण करून **"अनेक जन्म संसिध्दी"** ह्या श्रीकृष्णाच्या ब्रम्हवाणीप्रमाणे हा जीव आपल्या अनेक जन्माच्या पापपुण्य कर्माच्या राशी भोगून जाळतो आणि आमचे साधनदाते स्वामी सांगतात **'हे शास्त्र कव्हणा प्रति न बोलावे!"** म्हणजे आमचे असावयाच्या म्हणजे आचारावयाच्या 'परीचे' म्हणजे "आचारतत्वप्रणालीचे" शास्त्र कुणाला सांगूं नका! असं कसं म्हणतील? असं असेल तर जीव संसार बंधनातून कसे मुक्त होतील? याचा सखोल विचार आपण नको का करायला?

थोडं विषयांतर करूयां. एक दिवस भटोबास स्वामींना विचारतात **जी जी; ज्ञान भक्ति वैराग्य एं तीन्ही एकएकासीचि होववेति : किंवा एक एक?** म्हणजे जी जी; ज्ञान, भक्ति, वैराग्य हे तीन्ही एकाच वेळी एका साधकाला आत्मसात होते की वेगवेगळ्या पुरूषाला? **सर्वज्ञे म्हणीतले : "एका ज्ञान होअवे : एका भक्ति होअवे : वैराग्य तें कव्हणाहीं न होअवे!"** मग स्वामी सांगतात वानरेया; एक जीव

एका देहांत फक्त ज्ञान प्राप्त करून ज्ञानाप्रमाणे यथार्थ आचरण करूं शकतो. तर एक जीव पूर्वदेहीक कर्मानुसार ईश्वरश्रीमुर्ति पासून विभक्त होत नाही. असा कुणी एकादा भक्त होउं शकतो. मात्र वैराग्य हे कुणालाच शक्य नाही. **जी जी : ते कां नव्हवे जी?** भटोबास विचारतात वैराग्य हे कुणाच्यानेही घडत नाही. हे कसं जी? **सर्वज्ञे म्हणीतले : तीसरीए धारेवरि चाले ऐसा कवणु असे?** स्वामी सांगतात "वानरेया; ह्या कलीयुगांत तलवारीच्या तीसऱ्या तिक्ष्ण धारेवर चालेल असा कोण आहे? मग स्वामी "खर्गधारेचा" दृष्टांत निरूपण करतात. **सर्वज्ञे म्हणीतले : वानरेया; कव्हणी एक खर्गधारेवरि चाले : अंगाचे लघुत्व : बुधिचे कौशल्य असे : तेयासि खर्गधार साधे! ना बुधीचे कौशल्य नाही : अंगाचे लघुत्व नाही! तो पडे! तेयाचे हातपाय तुटति :** स्वामी म्हणतात, "वानरेया; कुणी एक बहुरूपिया तलवारीच्या तिक्ष्ण धारेवर चालण्याची कसरत करतो. ज्याच्यापाशी बुध्दिचे कौशल्य आहे! म्हणजे यथार्थ ज्ञानाची परिपक्वता आणि ज्ञान परिपक्वतेतून शरीराला आकुंचन करून त्या धारेवरून चालण्याचं कसब येते, तोच त्या तिक्ष्ण धारेवरून चालूं शकेल. ज्याला ज्ञानाची परिपक्वता नाही! शरीराला आकुंचन करण्याचं कसब नाही. तो पाउल ठेवताच धारेवर पडतो आणि त्याचे हातपांय तुटतात. **तैसे अनुसरलेया पुरूषासि विचाराची संपूर्णता होआवी : आन आचाराची नीपुणता होआवी : तयाचे जन्म कडे पडे :**

तसेच जन्ममरणाच्या दु:खदाइ संसारबंधातून मुक्त होण्यासाठी अनन्यगति एका ईश्वराला शरण गेलेल्या पुरूषाला यथार्थ विचाराची म्हणजे ज्ञानाची परिपक्वता आसावी लागते आणि ज्ञान परिपक्वतेने, नैपुण्यतेने जो आचरण करतो. त्याचा जन्म ईश्वराच्या सार्थकी लागतो. अनन्यगति ईश्वराला शरण येउन ज्याला ईश्वराने ब्रम्हविद्याशास्त्राधारे नीरूपिलेल्या चार पदार्थाच्या कारण, स्वरूप, लक्षण आणि कार्याचे यथार्थ ज्ञान नाही आणि आचाराची परिपक्वता नाही. त्याचा जन्म ईश्वराच्या सार्थकी लागत नाही. ईश्वराचं मोक्षपद अंतरते.

याच्या उलट एका लीळेचा थोडक्यात सारांश सांगतो. आउसा नेहमी हात, पाय, तोंड स्वच्छ धुवून, कपाळावर आडवा तीन रेषांकित चंदनाचा टीळा लावत असे. मग स्वच्छ धुतलेलं लुगडं किंवा धोतर नेसून डोइवरून पदर घेवून थाटात भीक्षेला जात असे. जाताना स्वामींना दंडवत करून जात असे. एक दिवस अशाच थाटांत स्वामींची आज्ञा घेण्यास येते. मग स्वामी तीला खडसावून विचारतात, **"नट्टापट्टा करणे हा धर्म वेशांचा की नायका!"** योगी, तपस्वि हा धुळमातीने

माखलेला असतो.' हे ऐकतांच आउसा कोपते ''बघा बघा हो बघा! उपसन्याची सून दिक्षितांची कन्या! वरून नाथपंथी उपदेश, चौवर्णी भीक्षा मागते आणि आतां श्रीकृष्णाची भक्ति करते. तर तुम्ही मला वेषेचे धर्म आचरते म्हणतां? बाप्पा, बाप्पा; गोड गोड बोलणाऱ्या देवा! मला नाही तुझ्यासारख्या देवाची गरज! मी काढीन माझा जोगवटा!'' असं म्हणून आपलं गाठोडं घेउन चौधोत्र्याला जाते. तीन दिवस स्वामींच्या दुराव्याने व्याकुळ होते. मग चौथ्या दिवशी निग्रह करून परत येते. दु:ख करीत म्हणते **जी जी : स्वामी जगन्नाथा; स्वामीचेन जाणे : स्वामीचेन येणे : बापुडा दुखिया होत असे जी : केही न पाठवावा!** म्हणजे जी जी; स्वामी जगन्नाथा; तुमचं हे दासरूं फार दु:खी कष्टी होतय जी! स्वामीपासून दूर जाउन परत स्वामीपाशी येइपर्यंत फार यातना होतात जी! पुन्हा असं कधी ऽऽ कधी पाठवूं नको जी!! मग स्वामी म्हणतात, असं काय म्हणतां नायका? आम्ही तुम्हाला पाठवलं? की तुम्हीच नीघून गेलेत? नायका; तपस्वाचं असं वागणं तर वेषा कशा वागत असतील? मग आउसा विचारते, ''जी जी : स्वामी जगन्नाथा; तपस्वीनी नटुं थटुं नये?'' स्वामी सांगतात, ''नायका; असा नट्टापट्टा तपस्वीनी करूं नये! मग आउसा म्हणते, ''जी जी; मग मी तपस्वीने कसं आचरण करावं ते निरूपावे जी स्वामी जगन्नाथा.''

**सर्वज्ञे म्हणीतले : जीतेनि मृत्यांचा धर्मी वर्तावे! आणि तुम्ही लिसी पुसी करीतां?''** स्वामी म्हणतात ''नायका; जिवंतानी मृत प्रेतासारखं असावं! जसं मृतं कलेवराला राग, द्वेष, काम, क्रोध, मद, मत्सर असे षड्विकार उत्पन्न होत नाहीत. तसेच साधकाने मानपान, अहंकार, अभिमान, सुंदर, आकर्षक दीसावं. ही देहावरील ममता आणि रज, तम गुणाचे कार्य जो स्थिरावतो तोच योगी, तपस्वी! आणि तुम्ही तर **लिसी पुसी करतां** म्हणजे नटुन थटुन भीक्षेला जातां? मग आउसा कबुल करते. होय होय, खरं सांगतां जी स्वामी जगन्नाथा; माझं असंच वागणं आहे जी. अशी मजकडून चूक होते खरी जी!

**सर्वज्ञे म्हणीतले : माकोडा असे : तो जीवन पाहे : तयाचें जीवन असुध : जीवन सांपडे : आणि धरी : तो झाडितां झडे ना : तोडिता तुटेना : ऐसाही तोडिजे तरिं तुटे : परि न सोडी :** स्वामी माकोडाचं उदाहरण (दृष्टांत) सांगतात. ''नायको;— माकोडा म्हणजे मोठा मुंगळा असतो. त्याचं भक्ष म्हणजे रक्त. तो भक्ष शोधतो, रक्तासाठी भक्षाला धरतो. मग त्याला झटकला तर उडत नाही, सहज

काढुं गेले तर सुटत नाही, बळाने काढला—तर त्याचं धड तुटून येतं आणि मरतो.''

**तैसें नायका; धड तुटलेयांही जीवे परमेश्वरातें न सोडावे :** तसेच नायका; जन्ममरणाचं दु:ख टाळण्यासाठी अनन्यगति ईश्वराला शरण गेलेल्या साधकाने जीवानांत कितीही दु:ख संकटं आली तरी मानवता धर्म रक्षणार्थ देह जाण्याची जरी पाळी आली तरी जीवानी ईश्वरधर्म सोडूं नये! मुक्तिची इच्छा सोडूं नये! जडचेतन पदार्थासाठी साधकाने देवतानीर्मित वैदिक कर्मकांडी धर्माचा अंगिकार करूं नये! **आणि तुम्ही वैद्यकमांत्रिक करितां की?** म्हणजे दु:ख, व्याधी, संकटांतून मुक्त होण्यासाठी लोकाना तुम्ही वैदिक मंत्रतंत्राचा कर्मकांडी उपाय सुचवतां. मग आउसा कबूल करते. होय जी स्वामी जगन्नाथा; आपण म्हणतां ते खरं आहे जी. मी असं करते जी.

**सर्वज्ञे म्हणीतले : नायका; महात्मेनि खळाळी मोकलावे : आणि तुम्ही रचमच करितां की?**

स्वामी म्हणतात नायका; महात्म्यानी कारणाशिवाय अर्थहीन बडबड, खळखळ सोडली पाहीजे. तर तुम्ही कुणाबरोबरही बडबड, मचमच करतां? **तुम्हा विजन नावडे** म्हणजे तुम्हाला एकांत आवडत नाही? होय जी; स्वामी जगन्नाथा ही मला वाइट सवंय आहे. **सर्वज्ञे म्हणीतले : हाडांची रांगवळी करावी नायका? आणि तुम्ही असुरपसुर आंथरूनि निजतां की?** स्वामी म्हणतात, ''नायका; जसं स्वान राखेंत, मातीत किंवा वाळूंत आपल्या शरीरापुरता **'खळाळी'** म्हणजे खड्डा करून झोपते तसं तुमच्यासारख्या तरूण महात्म्यानी आपलं अंग चोरून निद्रा करावी. तर तुम्ही **आसुरपसुर** म्हणजे ऐस पैस अंथरूण घालून झोपतां? आउसा कबुल करते होय जी. माझं असंच झोपणं असते जी! **महात्मेनि कटंकटीएमान होउनि असावे आणि तुम्ही जें जें रूचे ते ते जेवितां :** म्हणजे साधकाने आपला देह नीरोगी तत्पर रहावा यासाठी योग्य आहार घ्यावा जेणेकरून आपलं शरीर हलकं, फुलकं, सडपातळ असावं. तर तुमचं आहाराविहारावर नियंत्रण नाही. तुमच्या जिव्हा इंद्रियाला जे जे रूचते ते ते यथेच्छ जेवतां? **हो कां जी** म्हणजे आउसा कबुल करते होय जी. **सुखसाधने देओ न पविजे नाएका! आणि जेणे दुख उपजे तो एथिचा उचित व्यापार न करा की?** म्हणजे अशा ह्या तुमच्या इंद्रियांना सुखकारक वाटणाऱ्या आचरणाने तुमचे गत् जन्मीचे पापपुंण्यादिकर्माचे भोग नष्ट होउन ईश्वरपद प्राप्त होणार नाही नायका! तर गत्जन्माच्या पापपुंण्यादिक

कर्मानुसार या जीवनात प्राप्त झालेले सुख, दु:ख, संकटांदिक भोग ते न कंटाळतां, कुणाशी दु:ख व्यक्त न करतां, कुणाच्या सहकार्याची उदा. जीव, देवता पासून, सहकार्याची अपेक्षा न धरतां, प्राप्त झालेले भोग तुम्ही भोगून संपवले पाहिजेत! तर आम्ही नीरूपिलेल्या सिध्दांतिक आचरणाचा तुम्ही कंटाळा करतां. होय जी; म्हणून आउसा आपली चुक कबुल करते. **सर्वज्ञे म्हणीतले : नायका; ऐसे हे एथिचे जो म्हणीतले करी : तेयाचे उठणें बैसणे इतुलेही वाया न वचे ! म्हणौनि एथिचें म्हणीतलें करावे :** स्वामी म्हणतात, ''नायका; आम्ही केलेल्या विचारपर, आचारपर ज्ञानोक्त आज्ञेने जो वागतो त्याचं उठणं बसणं येवढंसही वाया जात नाही. म्हणून तुम्ही आमच्या आज्ञेप्रमाणे वागा!

तात्पर्य:— ह्या लीळेत स्वामींनी आचारपर वचनं नीरूपिली आणि आउसा त्यांच्या विरूध्द आचरण करते. म्हणून स्वामी तीला खडसावत विचारतात. या लीळेतील स्वामींच्या आणि आउसांच्या संभाषणातील विषय तुमच्यासमोर सादर केलेला आहे. **''अर्थ तो प्रकरण वशे''** ह्या स्वामींच्या वचनानुसार लीळेतील प्रसंग काय सांगून जातो? आणि लीळेतील स्वामी वचनाचा अर्थ पोथीकर्त्यांनी, पक्षकरानी कसा लावला आहे. तो संपादनकर्त्या माधवराज पंजाबीनी छापलेल्या **'आचरस्थल महाभाष्य'** ह्या ग्रंथातील पान नं. २८८ वरील वचन **''जीतेनि मृतांचा धर्मी वर्तावे!''** पुढे वचन ७४ पासून पान नं. ३०८ पर्यंत **''तयाचे उठणे बैसणे इतुलेही वाया न वचे''** ह्या ८० व्या वचनापर्यंत वाचून, मनन करून पाहावे. अर्थाअर्थि काही मेळ बसतो कां? बघा वाचून!! असो......!

१) म्हाइंभट अनुसरले म्हणजे काय?

२) डोमेग्रामी प्रथमभेटित स्वामीबरोबर झालेल्या शास्त्रसिध्दांतीक चर्चेत म्हाइंभट्ट पराजीत होतात. मग स्वामी म्हाइंभटाना पुर्वी निरूपण करतात.

**सृष्टीमध्ये कव्हणे करणे : मुंचीजेना एके परमेश्वरे वीण :**

**तोचि परमेश्वर निरवेव निराकार असे :**

**परि कृपावषे : सावेव साकार होए : अवतरे :**

**आपुले सन्निधान (ज्ञान) दे : तें दास्य (ज्ञान) मोचक :**

बंधुनो; तुमच्या समोर एक विचार ठेवतो पटत असेल तर बघा! ईश्वर हाता पायांदिक सर्व अवयवानी साकार झालेला अवतार म्हणजे व्यक्त झालेला आहे. म्हणजेच समाजात परमेश्वर प्रगट झाला आहे. प्रगट होउन काय करतो? तर आपल्या ब्रम्हविद्या शास्त्राचं ज्ञान सांगतो. त्या ज्ञानाप्रमाणे जो जीव आचरण करतो. तेच ज्ञान जीवाला भवबंधनातून मुक्त करणारं आहे. असा याचा सरळ सरळ अर्थ सांगतो.

तर त्या धर्ममार्तंडानी सर्वज्ञाच्या सूत्राचा शब्द प्रयोग कसा केला तो पाहा. **"अवतरे आपुले संन्निधान दे ते दास्य मोचकं!"** तर खरं म्हणजे **"अवतरें आपुले ज्ञान दे : ते ज्ञान मोचक!"** असा शब्द प्रयोग सरळ सरळ पाहीजे होता नाही कां? पहा जरा विचार करून!

याचा अर्थ पोथीकार सांगतात. **"ईश्वराची अंगी जीवी ते सेवा आणि बाह्य ते दास्य"** असा अर्थ पोथीकारानी लिहून ठेवला आहे. आपण विचार करा की ईश्वर विकारी आहे? की निर्विकारी आहे? तर ईश्वर निर्विकारी आहे.

पहा अंगाची सेवा म्हणजे हात—पाय—पाठ चेपणे, डोकं दाबणे वगैरे वगैरे अशी ही अंगाची सेवा केल्याने बरं वाटणं. मग प्रश्न असा उपस्तित होतो की निर्विकारी परमेश्वराचे हात—पाय—डोकं दुखेल काय? हात—पाय—पाठ—गुढगे, कंबर, डोके वगैरे दुखणी ही विकारी जीवाला लागू पडतात. ईश्वराला कशी लागू पडतील?

आतां **"बाह्य ते दास्य"** बाह्य ते दास्य म्हणजे फुलें आणून गळ्यातली माळा, हातसरे, बाहुभुषणे, मुगुटमाळा असे पुष्पांचे अलंकार बनविणे, धुपार्ति—मंगलार्ति करणे, चंदन उगाळणे, श्रीमुर्तिची पूजा करणे असे हे बाह्य दास्य पोथीकार सांगतात. तर प्रश्न असा उपस्थित होतो की, असं बाह्य दास्य करून आणि अंगीजीवी सेवा करून जीवांनी अनंत जन्मात केलेल्या पाप—पुंण्याचे कर्मभोग नष्ट होतील काय? जळतील काय? आपण संसारबंधातून मुक्त होउं?

असा हा पोथीकारांचा सिध्दांत जर खरा मानला तर **'तुम्ही महात्मे कीं गा! तुम्ही सकळही भोगे निमानावे कीं!'** म्हणजे तुम्ही महान जिवात्मे आहांत! जो तुम्ही ईश्वर जाणला. संसार बंधातून तुम्हाला मुक्त व्हायचं असेल तर जिवनात येणारी सुख—दुःख—संकटांचे भोग कोणतींही कर्मकांडे न करतां भोगून संपवा. कर्म

बंधनातून मुक्त व्हा! असं स्वामींनी कां सांगितलं असेल? याचा तुम्हीच विचार करून पाहा.

आतां आपण पुन्हा पुर्वीकडे वळुया.

तात्पर्य:— शास्त्र सिध्दांताचा 'पुर्वी' हा पाया आहे. फाउंडेशन आहे. तेच त्यानी कमकुवत करून ठेवलं! असो!! आता आपण लीळेकडे वळुया. तर 'ज्ञान मोचक' या शब्दप्रयोगाने लीळेची बांधणी करूया. लक्ष देवून ऐका!

सर्वज्ञानी पुर्वि निरूपण केल्यावर म्हाइंभट विचारतात, जी जी; सावेवसाकार ईश्वराचं ज्ञान जीवाला भवबंधनातून मुक्त करणारं आहे. असं आपण म्हणतां तर आज विद्यमान कोणता ईश्वरअवतार आहे. जो आम्ही त्याचे ज्ञान घ्यावं? मग स्वामी सांगतात **जैसे द्वापरी श्रीकृष्णचक्रवर्तिचे ज्ञान प्राप्त झालं** तर हा जीव भवबंधनातून मुक्त होइल! यावर म्हाइंभट विचारतात जी जी; ते युगही गेले आणि श्रीकृष्णचक्रवर्ति आपलं अवतारकार्य आटोपून निजधामी गेले. मग प्रत्यक्षांत त्यांचं ज्ञान कसं घडेल? मग स्वामी सांगतात **जसे सह्याद्री श्रीदत्तात्रयप्रभूंचे ज्ञान प्राप्त झालं**— तर हा जीव भवबंधातून मुक्त होइल! यावर म्हाइंभट शंका करतात जी जी; श्रीदत्तात्रय प्रभूंचे अमोघ, दुरापास्त दर्शन आहे. ज्यांचं साक्षात दर्शनच घडत नाही तर ज्ञान कुठून प्राप्त होणार? मग स्वामी सांगतात **जसे द्वारावतीकार श्रीचांगदेवराउळ!** त्याचं ज्ञान प्राप्त झालं तर हा जीव भवबंधनातून मुक्त होइल! यावर म्हाइंभट शंका करतात जी जी; द्वारावतीकार श्रीचांगदेवराउळांविषयी मी ऐकलं आहे की ते ईश्वरपुरूष होते. पण त्यानी तर हटयोगीनी कामाख्यानीमित्ते देहत्याग केला. मग त्यांच्यापासून "ज्ञान" कसं प्राप्त होइल? मग स्वामी सांगतात. **जसे आजकाल रूध्दपुरीं श्री गुंडमराउळ त्यांच ज्ञान प्राप्त झालं** तर हा जीव भवबंधनातून मुक्त होइल! यावर म्हाइंभट शंका करतात. जी जी; आम्ही ऐकलं आहे की ते रूध्दपुरी अनेक चमत्कारिक, अलौकिक लीळा करतात. लोक त्याना ईश्वरपुरूष म्हणून संबोधतात. परंतु त्यांचं वर्तन वेड्यापीशासारखं आहे. ते आपल्याजवळ कुणालाही फिरकूं देत नाहीत आणि ते काय बोलतात तेही कुणाला कळत नाही. तर त्यांच्याकडून ज्ञान कसं प्राप्त होइल? मग स्वामी युगानुसार ईश्वर अवतारांचा इतिहास सांगून स्वत:च्या मांडीवर थाप मारून म्हणतात. भटो; **जसे पैठण येथे श्रीचांगदेवराउळ!** म्हणजे आमचं ज्ञान ज्या जीवाना प्राप्त होइल ते जीव भवबंधनातून मक्त होतील!

हे स्वामींचे अमृतवर्षिणीशब्द कानी पडतांच म्हाइंभटाना बोध होतो. बोध म्हणजे जाणिव होते की मी पामर जीव आहे. आणि ज्यांच्या समोर मी बसलो आहे तो साक्षात सावेवसाकार ईश्वर आहे. अशी जाणीव होतांच म्हाइंभट पट्कन उठतात श्रीचरणी लोटांगण घालतात. मग स्वामींचा उचिष्ट प्रसाद घेउन घरी जातात.

मग तिसऱ्या भेटित **कर्म, धर्म, विधी, विखोचा** त्याग करून अनन्यगति एकनिष्ट एका ईश्वराला अनुसरतात म्हणजे शरण जातात.

त्या नंतर बरेच दिवस, महीने वरचेवर स्वामींच्या सहवासांत येउन 'उत्पत्ति, स्थिती आणि संव्हार' ह्या सृष्टीच्या गतिमानतेचं गुह्य रहस्यज्ञान जाणून घेतात. जे देवादिकाना, जीवाना माहीत नाही म्हणून गुह्य ते जाणून घेतात.

तात्पर्य:– पुढे मुद्दा असा उपस्थित होतो की स्वामीचं ब्रम्हज्ञान प्राप्त करून घेणे आणि ते ज्ञान जीव, देवता निर्मित कर्मकांडांत अडकलेल्या समाजाला शिकवणे म्हणजे सेवा करणे असा सिध्दांत असताना म्हाइंभट अचानक रूध्दपुरी ज्ञान न सांगणाऱ्या गोवींदप्रभूना शास्त्रकारांच्या अर्थाने अनुसरतात. आतां असा विचार करून पाहा की लीळाचरित्रांतील पुराव्यानुसार म्हाइंभट डोमेग्रामी श्रीचक्रधरस्वामींना ''दोन'' वेळा अनुसरले. मग रूध्दपुरी गोवींदप्रभूना एकवेळ अनुसरले. आतां पहा एक व्यक्ति तीन तीन वेळा अनुसरते म्हणजे अनुसरणाची व्याख्या किंवा यथार्थ काय समजावा? ज्ञानापासून 'अनभिज्ञ' समाजाने?

मुद्दा १:– अनुसरलेल्या चर्चेविषयी स्वामी म्हाइंभटाना सांगतात **नीरसा, नीराशा, नीराश्रया होउन असावे!** म्हणजे संसारातील अष्टभोगावरून नीरस व्हावे! समाजातील, मानमान्यतेवरून नीरस व्हावे! जिवनांत पूर्वकर्मानुसार उभे राहिलेल्या दु:ख, संकटांदिक भोगापासून मला कुणीतरी जीव, देवता सोडवील अशा प्रकारच्या आश्रयाचा विचार मनातही आणू नये. असं सांगतात.

मुद्दा २:– **द्रव्य संबंधासाक्षि न ठाकावे!** म्हणजे शब्दार्थावरून बोलायचं तर आपल्या प्रापंचीक गरजा भागविण्यापुरत्या द्रव्या व्यतिरिक्त द्रव्यलोभामागे धाउं नये!

मुद्दा ३:– **क्रय विक्रर न करावे!** म्हणजे खरेदी विक्रीचा व्यवहार, धंदा करूं नये. अशा प्रकारची अनेक वचने (श्रृती) अनुसरलेल्या पुरूषाला सांगितलेली आहेत.

असं असताना म्हाइंभट रूध्दपुरी श्रीप्रभूंना अनुसरल्यानंतर तेथे सोन्याचं दुकान थाटतात. याला काय म्हणावे? यावर असे प्रश्न उपस्थित होतात की

प्रश्न १:— सोन्याचं दुकान थाटायला म्हाइंभटानी भांडवल आणलं कुठून?

प्रश्न २:— रूध्दपुरी अनुसरण्यास जाताना म्हाइंभटानी अंगावरील चांगले कपडे काढून एका गरीब ब्राम्हणाला दान केले व त्याचे फाटके, मळके कपडे घालून रूध्दपुरी गेले. स्वामींची श्रृती आहे. **मार्गी पडिले वस्त्र घेइजे!** असं वचन असताना सोन्याच्या दुकानात बसणाऱ्या मालकाच्या अंगावर भरजरी कपडे असावे लागतात. ते कपडे म्हाइंभटानी आणले कुठून? की त्यानी पुन्हा भिक्षुकीचा व्यापार करून कमविले?

प्रश्न ३:— सोन्याच्या **'क्रय'** म्हणजे खरेदी **'विक्रय'** म्हणजे विक्री अशा व्यापारातून कमावलेलं सर्व द्रव्य म्हणे श्रीप्रभूंच्या रोजच्या खर्चाला उपयोगी नेत असतं.

प्रश्न ४:— तर श्रीप्रभूंच्या अगाध लीळांमधून असं सिध्द होतं की श्रीप्रभू गावोंगावी अठराफगड जातीतील लोकांच्या घरोघरी फीरत. घरोघरी जाउन त्यांच्या उतरंड्या उतरून भोजन करीत असतं. असं असताना म्हाइंभट सोन्याच्या व्यापारातून कमावलेलं द्रव्य श्रीप्रभू कोणत्या कार्यासाठी उपयोगी नेत असतं?

क्षमा करा! न राहून काही अभद्र लिहीतोय. अपप्रचार किंवा माझ्याविषयी समाजाचा बुध्दीभेद करूं नका.

प्रश्न ५:— श्रीप्रभू सप्तव्यसनाच्या आहारी गेले होते काय? जो त्यांच्यासाठी येवढा खर्च म्हाइंभटाना करावा लागत होता! तोही म्हाइंभट फक्त सहा महीने होते तीथ पर्यंत! पुढे काय?

प्रश्न ६:— म्हणे म्हाइंभटांचा मळवत त्याग! यालाच मळवतत्याग म्हणतात कां?

प्रश्न ७:— दुसरा एक प्रश्न असा सतावतो की म्हाइंभट श्रीप्रभूना अनुसरण्यापूर्वी जवळपास अंदाजे श्रीप्रभूंच्या ८० एक वर्षाच्या कालावधित श्रीप्रभूंचं योगश्रेम कोण चालवीत होता? जो म्हाइंभटानी फक्त सहा महीने सोन्याचा व्यापार करून चालविला? आणि मग पुढे कुणी चालविला? याचं उत्तर कुणी देइल कां?

काही महात्म्याना मी वरील प्रश्न विचारला तर सांगतात श्रीप्रभूच्या राहाण्यासाठी जागा पाहीजे होती त्या जागेसाठी म्हाइंभटानी सोन्याचं दुकान थाटलं. असं सांगून त्यानी माझी बोळवण केली. म्हणजे त्यांच्या सांगण्याच्या

अविभार्वावरून मी पुढे त्याना विचारायचं सोडून दिलं. कारण **महात्म्याचा अंत न पाहीजे की!** ह्या स्वामी वचनाचं स्मरण झालं.

स्वामी प्रथम भेटित म्हाइंभटाना निरूपण करतात. सृष्टीमध्ये म्हणजे ह्या व्यक्त प्रापंचिक सृष्टीमध्ये **कवणे करणे** :– कवणे करणे म्हणजे जीव, देवता निर्मित, वैदिक कर्मकांडानी, जप–तप, यज्ञ, व्रतवैकल्ले आणि अज्ञानातून निर्माण केलेल्या अंधश्रध्दाश्रीत कर्मकांडानी हा जीव दुःखदाइ संसार बंधातून मुक्त होत नाही. **ऐके परमेश्वरे वीण** म्हणजे एका परमेश्वराच्या ज्ञाना वाचून. **तोच परमेश्वर निरवेव नीराकार असे** म्हणजे तोच परमेश्वर नखाग्रापासून केसाग्रापर्यंत हस्तपादादि अवयवां विरहीत असला **परि कृपावषे सावेवसाकार होय** तरि आपल्या कृपा गुणाला वष होउन नखाग्रापासून केसाग्रापर्यंत हस्तपादादि अवयवांसह आकार धारण करून **अवतरे : आपुले ज्ञान दे! ते ज्ञान मोचक!** म्हणजे मनुष्य रूपाने समाजात प्रगट होतो आणि समाजाच्या सहवासात राहून संसाररूपी दुःखदायी कर्मबंधातून जीवानामुक्त करण्यासाठी आपल्या ब्रम्हविद्याशास्त्राद्वारे **'असतिपरी'** म्हणजे जीवांच्या आचारतत्वप्रणालीचे ज्ञान निरूपण करतो. त्या ज्ञानाप्रमाणे देहांतापर्यंत आचरण केलं तर हा जीव दुःखदायी संसारबंधातून मुक्त होतो!

असा सरळ सरळ सिध्दांत स्वामींनी आढेवेढे न घेता समाजासमोर मांडलेला आहे. तर आपल्याला आजपर्यंत सेवा दास्याचा अर्थ सांगताना असं सांगितलं जातं की **"अंगी जीर्वी ते सेवा!"** म्हणजे जीवानी ईश्वराच्या श्रीमुर्तीची सेवा करणे. उदा. उटणे, तेल लावून श्रीमुर्तिला चोळणे, गरम, थंड पाण्याने स्नान घालणे, गंधाक्षता, वीडा अर्पण करून पूजा अवसर करणे, भोजन देणे, बैठक घालणे, अंथरूण घालणे वगैरे वगैर. हे झालं सन्निधानी तर असन्निधानी अधिकरण, ज्ञानीया भक्ताची असी सेवा करणे. तर विचार करा की **भक्त वीयोगी नुरे!** या वचनाचं काय? अंगिजीवी सेवा करणे म्हणजे ईश्वराच्या सन्निधानी भक्तानी जशी श्रीमुर्तिची सेवा केली तशी असन्निधानी वरील अधिकरण, ज्ञानी भक्ताची अंगिजीवी सेवा करणे. म्हणजे ईश्वराच्या सन्निधानी भक्तानी जशी श्रीमुर्तिची सेवा केली तशी असन्निधानी वरील पात्रांची सेवा करा! असं सांगितलं जातं.

तर विचार करा की, फक्त ईश्वर श्रीमुर्तिची अंगलग सेवा करून जर जीव मोक्षपदाला गेले असते तर प्रथम सृष्टीतच देवाने आपल्या प्रवृत्तिने जेव्हा जीवाना मनुष्यजन्माला घातलं, तेव्हां सर्व जीव पापपुण्यादि कर्मबंधापासून कोरे होते. तेव्हांच

श्रीमुर्तिचं सेवादास्य करवून जीवाना मोक्षपदाला कां पाठवलं नाही? असा प्रश्न उपस्थित होतो की नाही? विचार करा!! असो!!

शास्त्रकारानी स्वामींच्या मुखी काही वचने घातली आहेत की **"परमेश्वरशात्री एवं वा नाही!"** ह्या वचनाच्या सिध्दांताला जुळतात कां ते पाहू.

**अहेतुक भुतभजन ज्ञानाप्रति साधन! अहेतुक मायापूर भजन प्रेमाप्रति साधन!**

'अ' म्हणजे नाही. हेतु म्हणजे अपेक्षा. हेतु विरहीत जर **भूत–** भूत म्हणजे माणसाला किंवा देवतेच्या विग्रहाला सहज म्हणजे पुण्यांची अपेक्षा न धरतां भोजन घातलं तरच ईश्वराच्या ज्ञानाचा योग येतो. असा सिध्दांत सांगितला जातो. मग आपण विचार करा की **"हेतु विरहीत ते क्रियाची नाही!"** असं स्वामीच सांगतात. या स्वामींच्या सूत्राचं काय? लक्षात घ्या की माणूस कोणतिही क्रिया हेतु शिवाय करणारच नाही! आणि बिचारा, गरीब, भीकारी, वैरागी म्हणून भोजन देणार. तर यामध्ये बिचारा वगैरे हेतूच आहे की नाही? याचा आपणच विचार केलेला बरा!

आतां 'अ' म्हणजे नाही. हेतुक म्हणजे इच्छा, अपेक्षा! हेतु विरहीत मायापूर म्हणजे ईश्वर श्रीमुर्तिला भोजन वाढलं तर प्रेमाचा उपाय साध्य होतो असं पोथीकार सांगतात.

आतां आपण विचार करूया की ईश्वर जीवाना आपला ब्रम्हांनंद देण्यासाठी आपल्या प्रवृत्तिने म्हणजे आपल्या ईच्छेने हेतुत: मायेकरवी सृष्टीची निर्मिती करून जीवाना मनुष्य जन्माला घालतात. याचा अर्थ असा होतो की निर्विकारी ईश्वरच जर निर्हेतूकपणे सृष्टीची निर्मिती करीत नाही. हेतू विरहीत जीवाना ज्ञान देत नाही तर विकारानी रचमच भरलेल्या जीवाला निर्हेतूक भूत भजन निर्हेतूक मायापूरभजन कसं काय घडूं शकेल? या उपस्थित मुद्याचा विचार ज्ञानीयांनी करावा ही विनंती.

बंधुनो; आपणच विचार करा की विकार, वासनानी रचमच भरलेल्या जीवाला निर्हेतुक भुत भजन : निर्हेतुक मायापूर भजन कसं घडेल?

आतां आपण **निर्हेतुक भुतभजन ज्ञानाप्रति साधन:** आणि **निर्हेतुक मायापूर भजन : प्रेमाप्रति साधन** या दोन सूत्रावर विचार मंथन करूया.

अ म्हणजे नाही. हेतु म्हणजे वासना, ईच्छा **भूत**– भूत म्हणजे देवतासृष्टी **भजन**– भजन म्हणजे भोजन नाही! तर भजन म्हणजे भक्ति! **ज्ञानाप्रति साधन–** म्हणजे ज्ञान ही देवतांची सिध्दी म्हणजे देवता साधनाच्या आधारे, मंत्रतंत्रांच्या

आधारे भक्ति करणे. ती भक्ति सुध्दा निष्काम, वासना विरहीत असावी लागते. अशा भक्तिने देवतेच्या अशास्वत मोक्षफळाची प्राप्ति होते.

तशिच अ म्हणजे नाही. हेतु म्हणजे वासना, ईच्छा, 'मायापूर' म्हणजे व्यक्तमंत ईश्वर, 'भजन' म्हणजे भक्ति! म्हणजे ईश्वराच्या ब्रम्हविद्याशास्त्र सिध्दांताच्या आधारे भक्ति करणे ती भक्ति ही वासना विरहीत निष्काम भक्ति केली तरच ईश्वराचं प्रेम प्राप्त होवून पुढे जीव संसारबंधनातून कायमचा शाश्वत मोक्षपदाला पावन होतो! असा हा अनुभवाला येणारा पटणारा सिध्दांत वाटतो? की पोथीकार सांगतात तो सिध्दांत अनुभवाला येणारा, पटणारा सिध्दांत वाटतो? ते ज्याने त्याने विचारमंथन करून पाहावे.

आतां मी पोथीकारांचा सिध्दांत विस्तारभयास्तव थोडक्यात मांडतो.

**अ** म्हणजे नाही, हेतु म्हणजे इच्छा, भूत म्हणजे देवतेचा विग्रह, म्हणजे देवतेचा अवतार. त्याला निर्हेतूक भजन म्हणजे भोजन, जेवण घातलं तर अशा जीवाला ईश्वराच्या ज्ञानाचा अधिकार निघतो.

आतां विचार करा की देवतेच्या भोजनाशी आणि ईश्वराच्या ज्ञानाशी संबंधच काय? भोजन म्हणजे जेवण. जेवण हा स्थुळ प्रपंच आहे. त्यामध्ये अजड मायेचं सामर्थ्य नटलेलं आहे. त्या अजड मायेच्या सामर्थ्याशी ईश्वराच्या ब्रम्हविद्या शास्त्राचा संबंधच काय? असे अनेक प्रश्न उभे राहतात. असो!!

आतां 'अहेतुक मायापूर' भजन प्रेमाप्रति साधन यावर मंथन करूया.

**अ** म्हणजे नाही, **हेतु** म्हणजे ईच्छा, वासना. **मायापूर** म्हणजे ईश्वराची व्यक्त श्रीमुर्ति त्याला निर्हेतुक भजन म्हणजे भोजन, जेवण घातलं तर अशा जीवाला ईश्वराच्या प्रेमाचा अधिकार निघतो!

आतां विचार करा की, भोजन हा 'अजड' मायेच्या सामर्थ्याने व्यक्त झालेला नाशीवंत स्थुळ प्रपंच आहे. जर जीवांनी कोणत्याही हेतु शीवाय ईश्वर श्रीमुर्तिला जेवू घातलं तर अशा जीवाला ईश्वर आपलं प्रेमसाधन देवून शिघ्रगतिने उध्दार करतात. असा सिध्दांत कलियुगीच्या परमेश्वराने सांगितला असं आपण गृहीत धरलं, तर प्रश्न असा उपस्थित होतो की सर्वज्ञाचं एक सूत्र आहे **"चहुं युगी एकचि धर्म!"** तर हाच सिध्दांत परमेश्वराने प्रथम प्रवाही सृष्टीत कां नाही सांगितला? असा हा सिध्दांत श्रीकृष्णानी गितेतही सांगितला नाही!

मग मुद्दा असा उपस्थित होतो की, जीव प्रथम दोन सृष्टीत मानसिक आणि वाचिक कर्म करून प्रवाही सृष्टीत आले होते, दोन सृष्टीमध्ये प्रारब्धकर्म त्यानी कोणतंच केलं नव्हतं. याचा अर्थ ते कोरे होते. तेव्हां अशा जीवाना अहेतुक पुरभजनाचा उपाय सांगून ईश्वराने कां नाही उध्दरलं?

पहिल्या प्रवाही सृष्टीतच परमेश्वराने आम्हाला सांगितलं पाहीजे होतं की 'बाळानो; मी ही सृष्टी तुम्हाला अविद्याबंधातून मुक्त करून माझा आनंद देण्यासाठी निर्माण केली आहे! ज्ञानाचरण करण्यांची तुमची योग्यता नाही. म्हणून मी तुम्हाला माझं प्रेम देवूनच उध्दार करीन! तो प्रेमाचा उपाय म्हणजे मी ह्या लक्षचौऱ्यांशी योनी विज्ञान सामर्थ्याने निर्माण केल्या आहेत. त्यात धान्याच्याही अनेक जाती आहेत. तांदुळ, गहुं, चणे, मीर्चि, मसाले वगैरे वगैरे तसेच अनेक प्रकारच्या फुलाचे टाटवेच्या वाटवे निर्माण केलेले आहेत, चंदनाच्या झाडांची मोठ मोठी अरण्ये निर्माण केली आहेत. कापसाची लागवड केली आहे. कापूस पींजा त्याचं वस्त्र विणा, चंदनाचं चांगलं मोठसं एक झाड तोडून आणा आणि ते एक मणभर उगाळा. फुलाच्या ताटव्यातील वेगवेगळ्या प्रकारची फुलें आणा, त्यांच्या मुगुटमाळा करा, गळदंडे करा, हातसरे करा, वेगवेगळ्या प्रकारची धान्ये काढून आणा. गायी म्हैशीचं दूध काढून आणा आणि माझ्या भोजनासाठी षड्रस युक्त १६० किंवा तुम्हाला शक्य होतील तेवढे पदार्थ करा, वेगवेगळ्यां सुगंधी वनस्पतित लोणी कालवून माझ्या सर्वांगाची चोळून चोळून सेवा करा. दुध, दही, थंडपाण्याने, गरम पाण्याने मला स्नान घाला, मग बोट रूतेल येवढा सर्वांगाला चंदनाचा लेप लावा, वस्त्र नेसवा आणि वगैरे वगैरे वगैरेनी माझी पूजा करून भोजनाचा उपहार करा. मग मी तुम्हाला प्रेम देवून तुमचा आतांच उध्दार करतो!! असा हा सेवेचा वीधि परमेश्वराने आम्हाला प्रथम प्रवाही सृष्टीत कां नाही सांगितला? आणि आतां हीन अशा कलियुगात 'अहेतुक मायापूर' भोजनाचा विधी परमेश्वर आम्हाला सांगतो!! याला काय म्हणावे? आपण सगळे प्रथम सृष्टीत शुध्द होतो, असा वीधि प्रथम सृष्टीत आपण सहज केला असता! नाही कां? ज्या अर्थि भोजनाचा सहज साधा वीधि प्रथम सृष्टित ईश्वराने आम्हाला न सांगितल्यामुळे आम्ही देहाने प्रारब्ध कर्मे करून लक्षचौऱ्यांशी योनिच्या नरकात पडलो. नाही कां? याचाच अर्थ असा होतो की आम्हाला लक्षचौऱ्यांशी नरक योनिच्या, जन्ममरणाच्या दुःखात लोटण्याला ईश्वरच जबाबदार होतो!! नाही कां? आम्हाला त्याने तमातून काढलंच कां?

लक्षचौऱ्यांशी नरकाची दु:खे भोगण्यासाठी? या अर्थि ईश्वरानेच आम्हाला नरकांत लोटलं! बघा खरं खोटं काय आहे ते! विचार करा!!

आतां महानुभावाच्या सिध्दांताविषयी विचार मंथन करूया.

१) अहेतुक भूत भजन ज्ञानाप्रति कारण

२) अहेतुक मायापूर भजन प्रेमाप्रति कारण

३) अन्नदान ते उत्तम मनुष्यत्वा ते पावे

४) दहा दिसां भीतरि कीजे ते पावे तेयाचे सगुण होए

१) देवतेच्या अवताराला निर्हेतुक भोजन घातलं तर ईश्वराच्या ज्ञानाचा योग जुळुन येतो.

२) ईश्वर श्रीमुर्तिच्या अवताराला निर्हेतुक भोजन घातलं तर प्रेम प्राप्त होतं.

३) अन्नदान केलं तर मनुष्य देह प्राप्त होतो म्हणजे लक्षचौऱ्यांशी नरक योनीचे दु:ख नष्ट होते.

४) दहा दिवसांच्या आत पात्र भोजन घातलं तर प्रतिदेहाचं भांडं फुटतं.

आता विचार करा की,

१) हे सगळं अन्नदानाने होतं तर मग ज्ञान अभ्यासण्याची गरज काय?

२) असतिपरी आचरण्याची गरज काय?

३) निरालंबी होण्याची गरज काय?

४) निर्हेतुक म्हणजे निष्काम कर्म करण्याची गरजच काय?

५) सर्वज्ञानी अनेक आचार सुत्रे सांगितलेली आहेत ती आचरण्याची गरजच काय?

बंधुनो; आतां आपण इथेच थांबुया. वाट पाहा तीसऱ्या विचारशलाकाची.

**।। सुंदर विचार आणि शुध्द आचाराची जोपासना।।**

**।। हिच खरी ईश्वर प्राप्तीची उपासना।।**

**जय श्री चक्रधर**

सर्वज्ञ समाज प्रबोधन संस्था (मुंबई)

ज्ञान मोचक

# सर्वज्ञ समाज प्रबोधन संस्था, मुंबई

## सामाजिक प्रकल्प

- ✓ समाजात आध्यात्मिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात जनजागरण करणे.
- ✓ सप्त व्यसनमुक्ती व अंधश्रध्दा निर्मुलनवर प्रबोधन करणे.
- ✓ बालसंस्कार केंद्र, सर्वज्ञ समाजप्रबोधन केंद्र, वाचनालय स्थापन करणे.
- ✓ निसर्गोपचार, प्राकृतीक चिकित्सा केंद्र स्थापन करणे, योगशास्त्र अध्ययन केंद्र स्थापन करणे.
- ✓ वृक्षारोपण, कृत्रिम जलाशय उभारणे, श्रमदान तथा स्वच्छता अभियान राबवणे.
- ✓ समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठी वृध्दाश्रमाची स्थापना करणे.
- ✓ स्थानाच्या मूळ स्थितीला धक्का न लावता सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या चरणांकित स्थानाचा संपूर्ण कायापालट (जीर्णोध्दार) करणे.
- ✓ सर्वज्ञाच्या चरणांकित स्थळी धर्मशाळा, अतिथिगृहे बांधून त्याची देखभाल करणे. समाजप्रबोधनासाठी महाराष्ट्रातील सर्वज्ञ श्रीचक्रधर चरणांकितस्थानी तीर्थयात्रा आयोजित करणे.
- ✓ समाजप्रबोधनासाठी ब्रम्हांडाचे सार दर्शवणारी गीता व्याख्यान मालिका आखणे. सर्वज्ञ श्रीचक्रधर यांच्या लीळांवर आधारित तयार झालेली दृक श्राव्य मालिका यासारखे उपक्रम विविध विभागातून राबवणे.
- ✓ महाराष्ट्रातील ठिकठिकाणी सर्वज्ञ समाजप्रबोधन केंद्र स्थापन करून प्रत्येक केंद्रात, लीळाचरित्र, सूत्रपाठ, जीवनधारा व संतांचे बोल तत्वज्ञानाच्या आधारे अभ्यासक्रम राबविणे.
- ✓ सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींच्या शिकवणुकीतून नवसमाज निर्माण करणे.

सर्वज्ञ समाज प्रबोधन संस्था® (मुंबई)

ज्ञान मोचक

Email: sarvadnyasamajprabodhansanstha@gmail.com
info@sarvadnyasamaj.com
Website : www.sarvadnyasamaj.com